पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १२/१२/२०१९

## पिडीत मुलीवर बलात्कार करणाऱ्यास १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा तसेच ६,०००/- रुपये दंड

=> जिल्हा सत्र न्यायाधीश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांचा न्यायनिर्णय

दिनांक २४/०८/२०१८ रोजी सकाळी १२:३० वा. दरम्यान आरोपी नामे सुनिल मरोती चिमुरकर वय ४५ वर्ष रा. एकोडी ता. चामोर्शी जि. गडचिरोली हा पिडीता ही तिचे गावी असतांना तिला माझे घरी एकोडी येथे चल असे म्हणुन सायकलवर बसवुन आपले घरी घेवुन गेला. व आरोपी हा आंघोळ करुन त्याचे घराचे दरवाजे बंद करुन पिडीत मुलीला बाजेवर ढकलले असता तिने विरोध केली असुन पिडीतेला थापडाने मारुन बळजबरीने तिच्यावर बलात्कार केला.

त्यानंतर पिडीत मुलीने आरोपी विरुध्द पोस्टे चामोर्शी येथे फिर्याद दिली. वरील फिर्यादावरुन अप. क्र. २२८/२०१८ कलम ३७६ (फ), ३२३ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले. सदर गुन्ह्याचे तपास मपोउपनि निशा खोब्रागडे पोस्टे चामोर्शी यांनी केले. तपास पुर्ण करुन आरोपीविरोधात सबळ पुरावा मिळाल्यानंतर दोषारोपपत्र तयार करुन मा. न्यायालयात दाखल केले. सरकार तर्फे फिर्यादी व ईतर साक्षीदारांचे बयान तसेच सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. न्यायालयाने आज दिनांक १२/१२/२०१९ रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांनी आरोपी सुनिल मरोती चिमुरकर यास दोषी ठरवुन कलम ३७६ (फ), ३२३ भादवी मध्ये १० वर्ष सक्षम कारावास व ६,०००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

तसेच सरकार पक्षातर्फे सहा. जिल्हा सरकारी वकील श्री. सचिन कुंभारे व सदर प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि श्री. प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.